**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी**
**बांधकाम विभाग**

**प्रस्तावना:-**

**विषय :-** प्रभाग क्र.४ च्या कार्यक्षेत्रात जुना आग्रा रोड, जुना ठाणा रोड, मोमीन मस्जिद जवळ, इसरार मिठाई शॉप ते कदिम मस्जिद, साजीद हॉल ते इदगाह पाण्याची टाकी ते डंपींगग्राऊंड, गौरीपाडा ते शकील बिल्डींग, नालापार रोड व विविध ठिकाणी डांबरीकरण पध्दतीने सुधारणा करणे.

भिवंडी नि.श.महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रभाग क्र.४ च्या कार्यक्षेत्रात जुना आग्रा रोड, जुना ठाणा रोड, मोमीन मस्जिद जवळ, इसरार मिठाई शॉप ते कदिम मस्जिद, साजीद हॉल ते इदगाह पाण्याची टाकी ते डंपींगग्राऊंड, गौरीपाडा ते शकील बिल्डींग, नालापार रोड व विविध ठिकाणी डांबरीकरण पध्दतीने सुधारणा करणे. रु.४९,९८,५८४/- मात्रच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी त्यास मान्यता दिलेली आहे. शासन आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४ दि.०६ जुन २०२ रोजी नुसार मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचा कार्यभार प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार प्रसाकिय ठराव व निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा.प्रशासक सो. यांना आहेत.

ठराव क्र. 929

दिनांक :- 10 /3 /२०२३

भिवंडी नि.श.महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र. ४ च्या कार्यक्षेत्रात जुना आग्रा रोड, जुना ठाणा रोड, मोमीन मस्जिद जवळ, इसरार मिठाई शॉप ते कदिम मस्जिद, साजीद हॉल ते इदगाह पाण्याची टाकी ते डंपींगग्राऊंड, गौरीपाडा ते शकील बिल्डींग, नालापार रोड व विविध ठिकाणी डांबरीकरण पध्दतीने सुधारणा करणे. रु.४९,९८,५८४/- मात्रच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, प्रभाग समिती क्र. ४ च्या कार्यक्षेत्रात जुना आग्रा रोड, जुना ठाणा रोड, मोमीन मस्जिद

जवळ, इसरार मिठाई शॉप ते कदिम मस्जिद, साजीद हॉल ते इदगाह पाण्याची टाकी ते डंपींगग्राऊंड, गौरीपाडा ते शकील बिल्डींग, नालापार रोड व विविध ठिकाणी डांबरीकरण पध्दतीने सुधारणा करणे. रु.४९,९८,५८४/- मात्रच्या कामाच्या प्रस्तावास मा.प्रशासकीय ~~ठरावाची~~ मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.श.महानगरपालिका

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी

**बांधकाम विभाग**

**प्रस्तावना**

**विषय :- प्रभाग समिती क्र.१ ते ५ च्या कार्यक्षेत्रातील नादुरुस्त रस्त्यांची डांबरीकरण पध्दतीने सुधारणा करणे.**

उपरोक्त विषयांन्वये भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेतील प्रभाग समिती क्र.१ ते ५ च्या कार्यक्षेत्रातील नादुरुस्त डांबरी रस्त्यांची एम.पी.एम.,डी.बी.एम. व बी.सी. पध्दतीने सुधारणा करणे कामी प्रस्तावित असुन, सदर रस्त्यांची सुधारणा करणे बाबत मा. आयुक्त सो. यांचे दि. ०२/०१/२०२३ रोजी मौखीक निर्देश प्राप्त झालेले आहेत. सदरील रस्ते परिसरातील रहदारीचे अंतर्गत रस्ते असुन सदर रस्त्यांवर ठिकठिकाणी खड्डे पडुन रस्ते नादुरुस्त झालेले आहेत. नादुरुस्त रस्त्यांमुळे परिसरातील वातावरणात धुळीचे प्रमाण जास्तीचे झाले असुन नागरिकांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे. नादुरुस्त रस्त्यांमुळे परिसरातील नागरिकांना रहदारी तसेच वाहनचालकांना देखील विविध अडचणीस सामोरे जावे लागत आहे. विषयांकित रस्ते डांबरीकरण पध्दतीने दुरुस्त केल्यास स्थानिक नागरिकांना तसेच रहदारीस सुविधा निर्माण होणार आहे. त्यानुसार प्रभाग समिती क्र. १ ते ५ यांचे खालील नमुद कामांचे प्रस्ताव तांत्रिक मान्यतेसह तयार करणेत आलेले आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) अन्वये प्रशासकिय व आर्थिक मान्यता मिळणे कामी व ई निविदा मागवणेकामीचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र | कामाचे नांव | अंदाजपत्रकिय रक्कम (रु.) |
|---|---|---|
| १ | प्रभाग समिती क्र.१ च्या कार्यक्षेत्रात चाविंद्रा,नथु नगर,तुकाराम नगर,बंदा मस्जिद,बाला कंपाऊण्ड,पटेल कंपाऊण्ड,गुलजारनगर व विविध ठिकाणी डांबरीकरणाने रस्ता दुरुस्त करणे. | ४९,९१,०८०/- |
| २ | प्रभाग समिती क्र.२ च्या कार्यक्षेत्रात भादवड पोलीस लाईन,टेमघर अंतर्गत रस्ते,शफि कंपा.नवीवस्ती व शिवसेना ऑफिस ते खान कंपाऊण्ड व विविध ठिकाणी डांबरीकरण पध्दतीने सुधारणा करणे. | ४९,९८,६१६/- |
| ३ | प्रभाग समिती क्र.३ च्या कार्यक्षेत्रातील पदमानगर,भाग्यनगर,कामतघर,फेणे व अंजुरफाटा परिसरातील रस्त्यांची डांबरीकरण पध्दतीने सुधारणा करणे. | ४९,९९,३९५/- |
| ४ | प्रभाग समिती क्र.४ च्या कार्यक्षेत्रातील जुना आग्रारोड,जुना ठाणारोड,मोमीन मस्जिद जवळ,इसरार मिंथल शॉप ते कदीम मस्जिद साजीद हॉल ते इदगा ई.एस.आर, ते डंपींग ग्राऊंड रोड,गौरीपाडा ते शकील बिल्डींग,नालापार रोड व विविध ठिकाणी डांबरीकरा पध्दतीने सुधारणा करणे. | ४९,९२,२४७/- |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रभाग समिती क्र.५ च्या कार्यक्षेत्रातील हसिन फरहान टॉकीज समोरील मिरॅकल मॉल ते एरोज कोल्ड्रींग,मंडई,पारनाका,समदनगर,कणेरी इ.परिसरातील रस्त्यांची डांबरीकण पध्दतीने सुधारणा करणे. | ४९,९९,५१०/- |
| | एकुण | २,४९,८०,८४८/- |

**ठराव क्रं. :**१२२ **दिनांक :-** १६/०३/२०२३

प्रभाग समिती क्र.१ ते ५ च्या कार्यक्षेत्रातील नादुरुस्त रस्त्यांची डांबरीकरण पध्दतीने सुधारणा करणे रक्कम **रु.२,४९,८०,८४८/-**(अक्षरी दोन कोटी एकुण पन्नास लाख एंशी हजार आठशे अठेचाळीस मात्र) कामीचे प्रस्ताव तयार करुन ई निविदा मागविणेच्या मंजुरी करिता सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ २०२०/प्र.क्र.७१/(भाग२) नवि १४ दिनांक ०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषतः कलम ४२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये प्रशासकिय व आर्थिक ठराव करणेकामी मंजुरी देत आहे.

(विजयकुमार म्हसाळ)
**प्रशासक तथा आयुक्त**
भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका

**<u>प्रस्तावना</u> :- घनकचरा प्रकल्प अहवालानुसार १ युनिट जेसीबी मशिन उपलब्ध होणेकरिता प्राप्त झालेल्या निविदाकार व निविदाकारांनी सादर केलेल्या खर्चास मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळणे बाबत.**

घनकचरा प्रकल्प अहवाला नुसार १ युनिट जेसीबी मशिन घेणेसाठी केंद्र शासनाच्या जीईएम पोर्टलवर फेर-२ मध्ये दि.२७/०१/२०२३ ते दि.३/०२/२०२३ याकालावधीत प्रसिद्ध करण्यात आली असता सदर निविदे करिता १ निविदाकार प्राप्त झाले होते.

प्राप्त १ निविदाकार यांनी निविदेच्या अटी-शर्तीनुसार आवश्यक कागदपत्रांची पुर्तता मा. निविदा समिती समक्ष करण्यात आली असता पात्र १ निविदाकार यांचे आर्थिक बोलींचा (लिफाफा क्र.२) लिफाफा खुले करण्यात आले असता खालील प्रमाणे त्यांनी एकुण खर्च सादर केले आहे.

| कामाचा तपशील | CASE NEW HOLLAND CONSTRUCTION EQUIPMENT (INDIA) PRIVATE LIMITED, DELHI |
|---|---|
| घनकचरा प्रकल्प अहवालानुसार १ युनिट जेसीबी मशीन उपलब्ध करुन घेणे बाबत. | १ युनिट जेसीबी करिता एकूण खर्च रु.२७,९७,७८०/- |

वरील तौलोनिक तक्त्याचे अवलोकन केले असता घनकचरा प्रकल्प अहवाला नुसार १ युनिट जीईएम पोर्टलच्या स्पेसिफिकेशन नुसार जेसीबी मशिन उपलब्ध करुन देणे करिता जीईएम पोर्टलवर मे.CASE NEW HOLLAND CONSTRUCTION EQUIPMENT (INDIA) PRIVATE LIMITED, DELHI यांनी रु.२७,९७,७८०/- इतका खर्च सादर केला आहे.

घनकचरा प्रकल्प अहवाला नुसार १ युनिट जीईएम पोर्टलच्या स्पेसिफिकेशन नुसार जेसीबी मशिन उपलब्ध करुन घेणे करिता रु.३०,६९,०००/- इतक्या खर्चास मान्यता प्राप्त असुन जीईएम पोर्टलवरील प्राप्त खर्चा नुसार रु.२७,९७,७८०/- असे प्राप्त झाले असल्याने मे.CASE NEW HOLLAND CONSTRUCTION EQUIPMENT (INDIA) PRIVATE LIMITED, DELHI यांनी याकामा करिता रु.२,,७१,२२०/- इतकी रक्कम कमी केली असता मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांनी दि.२३/०२/२०२३ रोजी मान्यता दिली आहे.

सबब घनकचरा प्रकल्प अहवाला नुसार १ युनिट जीईएम पोर्टलच्या स्पेसिफिकेशन नुसार जेसीबी मशिन उपलब्ध करुन घेणे करिता मे.CASE NEW HOLLAND CONSTRUCTION EQUIPMENT (INDIA) PRIVATE LIMITED, DELHI यांनी रु.२७,९७,७८०/- असे सादर केले असुन सद्यास्थिती सादर केलेल्या निविदाकारास व खर्चास मा.स्थायी समितीची मान्यता घेणेसाठी मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार संविदा होणेसाठी मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांची मान्यता मिळावी ही विनंती.

प्रशासकिय ठराव क्र. 923 दि.१६/ 03 /२०२३.

घनकचरा प्रकल्प अहवाला नुसार १ युनिट जीईएम पोर्टलच्या स्पेसिफिकेशन नुसार जेसीबी मशिन उपलब्ध करुन घेणे करिता मे.CASE NEW HOLLAND CONSTRUCTION EQUIPMENT (INDIA) PRIVATE LIMITED, DELHI यांनी रु.२७,९७,७८०/- असे सादर केले असुन प्राप्त झालेले पुरवठाधारक व त्यांनी सादर केलेल्या खर्चास मा.प्रशासक तथा आयुक्त सो.यांची मान्यता मिळणे बाबत विनंती आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ २०२०/प्र.क्र.७१(भाग२)/ नवि,दि.६/०६/२०२२ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२ अ (१अ) व १ (ब) च्या तरतुदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार (महासभा व स्थायी समितीचे अधिकार) मी विजयकुमार म्हसाळ प्रशासक तथा आयुक्त,भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, घनकचरा प्रकल्प अहवाला नुसार जीईएम पोर्टलवरील निविदे प्रमाणे मे.CASE NEW HOLLAND CONSTRUCTION EQUIPMENT (INDIA) PRIVATE LIMITED, DELHI यांनी १ युनिट जेसीबी मशिन नमुद स्पेसिफिकेशन नुसार उपलब्ध करुन देणेसाठी रु.२७,९७,७८०/- इतका खर्च सादर केला असल्याने निविदाकारास व खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ (क) नुसार मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**

69 -D:\Health Dep-2023\MY DOC -11-03- 2023 -\TENDER FORM-2023.doc3